**<u>मोटार सायकल खरेदी करण्यासाठी शासकीय अग्रिम मिळणेबाबत आवश्यक असणारी कागदपत्रे :</u>**

१) अर्जदाराचा विहित नमुन्यातील अर्ज (शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ०३.०२.२०१२ नुसार उपलब्ध असलेला नमुना).

२) अर्जदाराने वाहन अग्रिम मिळणेबाबतचा अर्ज या संचालनालयास ऑनलाईन पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे (Online Status Report).

३) अर्जदाराच्या स्थायित्व प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत.

४) शासन निर्णय दिनांक २०.०८.२०१४ मधील अनुक्रमांक २ नुसार मोटार सायकल/स्कुटर/मोपेड वाहन चालविण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडून कुटूंबातील एका व्यक्तीला मिळालेल्या अनुज्ञप्तीची (Licence) ची छायाप्रत अर्जदाराने सादर करणे आवश्यक आहे.

५) अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी करावयाच्या वाहनासंबंधीची सर्व माहिती दर्शविलेले दरपत्रक मुळ स्वरुपात विक्रेत्याच्या सही व शिक्क्यासहीत अर्जदाराने सादर करणे आवश्यक आहे (Original quotation with valid signature and stamp of authorised distributor of vehicles).

६) अर्जदाराने त्यास या संचालनालयाचे स्तरावरुन वाहन अग्रिम मंजूर होण्यापुर्वी "मुंबई वित्तीय नियम १९५९" मधील नियम १३६, १३७ व १३९ मध्ये उल्लेख केलेल्या तरतुदीनुसार नमुना क्रमांक २० मधील करारपत्र या संचालनालयास सादर करणे आवश्यक आहे.

७) शासन निर्णय दिनांक २०.०८.२०१४ मधील अनुक्रमांक ८ नुसार अर्जदाराच्या वेतनामधून होणारी एकुण वजाती त्याच्या मासिक वित्तलब्धीच्या ५०% पेक्षा अधिक नसल्याबाबत कार्यालयप्रमुखांची शिफारस असलेले प्रमाणपत्र.

८) वाहनाचा विमा, विमा संचालनालयाकडे उतरविण्याबाबतचे अर्जदाराचे हमीपत्र.

९) अर्जदाराच्या कुटूंबाचा तपशील दर्शविलेले विवरणपत्र.

१०) अर्जदाराच्या अपत्यांचा तपशील दर्शविलेले विवरणपत्र.

११)अर्जदाराच्या बँकेचा संपूर्ण तपशील (बँकेचे नांव, शाखेचे नांव, खाते क्रमांक, आयएफएससी कोड, शाखेचा कोड इत्यादी).

१२) अग्रिम मंजूर झाल्यानंतर वाहन शासनाकडे गहाण ठेवण्याबाबत अर्जदाराचे हमीपत्र.

१३) अग्रिमाची वसुली मृत्यु-नि-सेवा उपदानामधून/राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमधून करण्याबाबतचे अर्जदाराचे हमीपत्र.

१४) शासन निर्णय दिनांक २०.०८.२०१४ मधील अनुक्रमांक ९ नुसार अर्जदाराने त्यास अग्रिम मंजूर झाल्यानंतर १ महिन्याचे आत वाहन खरेदी करुन त्यासंबंधीची सर्व कागदपत्रे शासनाकडे सादर करणेबाबतचे हमीपत्र.

१५)अर्जदारास यापुर्वी शासकीय मोटार सायकल/मोटार कार/स्कुटर/मोपेड अग्रिम मंजूर झाले नसल्याबाबत कार्यालयप्रमुखांची शिफारस असलेले प्रमाणपत्र.

<u>अग्रिम मंजुर झाल्यानंतर सादर करावयाची कागदपत्रे--</u>

१) ज्या कारणासाठी अग्रिम मंजूर केले आहे त्याच कारणासाठी अग्रिमाची रक्कम वापरल्याबाबतचे अग्रिमधारकाचे उपयोगिता /विनियोग प्रमाणपत्र.

२) Financial Rules Form no. २१ मधील गहाणखत.

३) विमा संचालनालयाकडून उतरविलेल्या वाहन विम्याची छायांकित व साक्षांकित प्रत. ( जरी विमा खाजगी संस्थेकडून उतरविण्यात आला असेल तरी वाहनाचा विमा शासकीय विमा संचालनालयाकडून उतरविणे आवश्यक आहे. )

४) वाहनाचे आर. सी. बुकची छायांकित व साक्षांकित प्रत.

५) विक्रेत्यास रक्कम प्रदान केल्याची मुद्रांकित छायांकित व साक्षांकित प्रत.